**वाचले :-**

१) शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९२/१०३३/प्र.क्र.३३/९२/८, दि.२ डिसेंबर १९९७.
२)शासन निर्णय क्र. अनियो-२०१९/प्र.क्र.४७०/सेवा-४, दि.९ मे २०२२
३)आदेश क्रमांक साप्रवि/३/कावि/२८४/२०२४,दि.२३/०१/२०२४
४)मा.मुख्य अभियंता,जलनि:सारण विभाग यांचेकडील पत्र क्र.जनि/०४/कावि/१७/ २०२५,दि.१७/०१/२०२५
५)श्री.गाडेकर सचिन आप्पासाहेब,कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांचा दि. ०९/०१/२०२५ रोजीचा विनंती अर्ज
६)मा.आयुक्त यांचेकडील दिनांक ०५/०२/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक साप्रवि/३अ/कावि/२१/२०२५
दिनांक ०७/०२/२०२५

**विषय :- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदाचा राजीनामा मंजूर करणेबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महापालिका आस्थापनेवर जाहिरात क्र. १८४/२०२२ अन्वये कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या अभिनामाची रिक्त पदे सरळसेवेने भरणेत आली होती. कर्मचारी निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावर प्रथमतः ०२ वर्ष परिविक्षाधीन कालावधीकरीता (Probation Period) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देणेकामी उपरोक्त वाचले क्र. ३ अन्वये आदेश निर्गत करणेत आला आहे. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदावरील श्री.गाडेकर सचिन आप्पासाहेब यांनी दि. ०९/०१/२०२५ रोजीचा अर्जान्वये १ महिन्याची पूर्वसूचना देऊन दि. ०९/०२/२०२५ पासून राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. श्री.गाडेकर सचिन आप्पासाहेब यांचा मनपा सेवेतील रुजू दिनांक, राजीनामा देण्याचे कारण यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव | मनपा सेवेत रुजू दिनांक | मनपा सेवेचा राजीनामा अर्ज दिनांक | मनपा सेवेचा राजीनामा मंजूर करावयाचा दिनांक | मनपा सेवेचा राजीनामा देण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ |
| १ | श्री.गाडेकर सचिन आप्पासाहेब | ०५/०२/२०२४ | ०९/०१/२०२५ | ०९/०२/२०२५ | महाराष्ट्र शासन,नगररचना विभाग, येथे रचना सहायक (गट ब) पदावर निवड |

श्री.गाडेकर सचिन आप्पासाहेब यांनी महाराष्ट्र शासन,नगररचना विभाग, येथे रचना सहायक (गट ब) पदावर निवड झाल्याने दिनांक ०९/०१/२०२५ रोजीचा अर्जान्वये १ महिन्याची पूर्वसूचना देऊन दि. ०९/०२/२०२५ पासून पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेचा राजीनामा मंजूर करणेकामी विनंती केली आहे. श्री.गाडेकर सचिन आप्पासाहेब यांचाकडून महानगरपालिकेस घरबांधणी कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, संगणक कर्ज, वाहन कर्ज, कामगार कल्याण निधी कर्ज येणे बाकी नाही व सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसून त्यांचा राजीनामा मंजूरीबाबत संबंधित विभागप्रमुखांनी स्पष्टपणे शिफारस केली आहे.

सबब, उपरोक्त वाचले क्र.१ व २ चे महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णयामधील तरतुदी, विभागप्रमुखांनी केलेली शिफारस व कर्मचा-यांनी केलेला विनंती अर्ज विचारात घेता मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रस्तुतच्या आदेशान्वये उपरोक्त श्री.गाडेकर सचिन आप्पासाहेब यांचा कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) पदाचा मनपा सेवेचा राजीनामा दि.०९/०२/२०२५ पासून मंजूर करण्यास मान्यता देत आहे. तसेच दि.०९/०२/२०२५ पासूनचा कालावधी विनावेतनी करण्यात यावा. त्याचप्रमाणे लेखापरिक्षणार्थ अन्य काही येणे रक्कम निघाल्यास ती संबंधित कर्मचा-यांनी भरणे बंधनकारक राहील.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.गाडेकर सचिन आप्पासाहेब यांच्या सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

सही/-
(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

प्रति -
श्री.गाडेकर सचिन आप्पासाहेब, कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)
प्रत -१. लेखा विभाग २. लेखापरीक्षण विभाग ३. दूरसंचार विभाग ४. माहिती व जनसंपर्क विभाग
५.कामगार कल्याण विभाग ६.साप्रवि टेबल क्र. ७,१०,१२,२२, सुंग.कक्ष (साप्रवि)
७. जलनि:सारण विभाग ८.सर्व संबंधित विभाग ९.माहिती तंत्रज्ञान विभाग

उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

E/prashasan/२०23/Class -२\ retirement.docx